Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- XI | ISSUE- V | MAY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास

**डॉ. खजूरकर दे. त्र्यं.**
श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
धाराशिव.
ई-मेल: khajurkar.devdatt26@gmail.com

**सारांश :**

*सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणाद्वारे शिक्षकांचा व्यावसायिक विकास साधला जातो. याचा चांगला परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर पाहायला मिळतो. गुणवत्तापूर्ण शिक्षक शिक्षण होण्याकरिता उत्तम शिक्षक प्रशिक्षकांची गरज असते. विविध शासकीय व खाजगी संस्थांमार्फत शिक्षक प्रशिक्षकांसाठी व्यावसायिक विकासासाठी संधी उपलब्ध करून दिलेल्या असतात. याचा उपयोग करून प्रशिक्षक त्यांचा विकास साधत असतात. सदर संशोधन पर लेखात प्रशिक्षकांनी कितपत प्रमाणात विकास साधला आहे व साधत आहेत याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

**प्रस्तावना :**

वर्गा वर्गातून देशाची पिढी आकार घेत आहे व त्यांना आकार देण्याचे कार्य अविरतपणे शिक्षक करतात. अशा शिक्षकांना घडविण्याचे कार्य शिक्षक प्रशिक्षक कुशलतेने करत असतात. यातून एक चांगला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षक प्रशिक्षक घडत असतो. प्रत्येक व्यवसायात नव्याने झालेले बदल हे त्या त्या व्यावसायिकास स्वीकारावे लागतात, तरच तो त्याच्या व्यवसायात गुणवत्ता पूर्ण कार्य करू शकतो.. शिक्षक प्रशिक्षकांना त्यांच्या व्यवसायात विविध भूमिका वटवाव्या लागतात. विविध जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतात. शैक्षणिक कार्यासोबत सामाजिक क्षेत्रातूनही कार्य करावे लागते. एन.सी.ई.आर.टी., एन.सी.टी.ई.,एस. सी.ई.आर. टी.,विद्यापीठे, महाविद्यालय इत्यादी संस्थांमार्फत व्यावसायिक विकास साधण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले जातात. याव्यतिरिक्त खाजगी संस्था मार्फत देखील प्रशिक्षण दिले जाते.

भावी शिक्षकांना घडविण्यासाठी ज्याच्या बाबींची आवश्यकता आहे त्याच्या पूर्ततेसाठी शिक्षक प्रशिक्षकांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वात व्यावसायिक विकासाद्वारे बदल घडवून आणणे कर्मप्राप्त ठरते. शिक्षक प्रशिक्षक स्वतःचा व्यवसायिक विकास घडवून आणण्यासाठी कोणते प्रयत्न करतात सद्यस्थितीत ते काय करतात त्यांना व्यवसायिक विकास घडवून आणताना कोणत्या अडचणी येतात यासंबंधीत अभ्यास सदर संशोधन पर लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.


**शिक्षक प्रशिक्षकांना व्यावसायिक विकासाची गरज:**

1. शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षक यांचे गुणवत्ता राखण्यासाठी आणि ती वृद्धिंगत करण्यासाठी.
2. नवनवीन ज्ञान, माहिती व तंत्रज्ञान यांचा स्वीकार करण्यासाठी.
3. बदललेल्या कार्यपद्धतींचे, अध्यापन पद्धतींचे ज्ञान मिळविण्यासाठी.

या व अशा विविध कारणांसाठी शिक्षक प्रशिक्षकांना व्यावसायिक विकासाची गरज असते.

**शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक विकासाचे विविध मार्ग :**

शिक्षक प्रशिक्षकांना त्यांच्या व्यवसायिक विकास घडवून आणण्यासाठी विविध मार्ग उपलब्ध असतात त्यापैकी काही मार्ग पुढील प्रमाणे होत.




**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यवसायिक विकासासंदर्भातील सद्यस्थितीची माहिती घेणे.
2. शिक्षक प्रशिक्षकांना व्यावसायिक विकासासंबंधी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
3. शिक्षक प्रशिक्षकांना व्यावसायिक विकासासंबंधी उपाय सुचविणे.

**संशोधन शीर्षक :**

शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास

**संशोधना कार्याची व्याप्ती :**

1. प्रस्तुत संशोधन कार्य धाराशिव शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाशी संबंधित आहे.
2. संशोधन कार्य हे शिक्षक प्रशिक्षकांची संबंधित आहे.

**संशोधना कार्याच्या मर्यादा :**

1.सदर संशोधन कार्य धाराशिव शहरापुरतेच मर्यादित आहे.

2.प्रस्तुत संशोधन कार्य हे बी.एड महाविद्यालय पुरतेच मर्यादित आहे.

3. प्रस्तुत संशोधन कार्य हे बी.एड महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षक या मानवी घटका पुरते मर्यादित आहे. 4.शिक्षक प्रशिक्षकांना व्यावसायिक विकास सद्यस्थितीचा व त्यात येणाऱ्या संबंधित अडचणींचा विचार केला असून अन्य कोणत्याही अडचणींचा विचार केलेला नाही

**नमुना निवड :** धाराशिव शहरातील पाच बी.एड. महाविद्यालयातील सर्व शिक्षक प्रशिक्षकांची निवड सदर संशोधन कार्यासाठी केली आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन हे वर्तमानकालीन समस्येची संबंधित असल्याने वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा वापर यासाठी करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :**

माहितीचे संकलन करण्याकरिता पडताळा सूची व प्रश्नावली या साधनांचा वापर सदर संशोधन कार्यासाठी करण्यात आला आहे.

**संशोधन कार्यपद्धती :**

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. यासाठी धाराशिव शहरातील बी.एड. महाविद्यालयातील 24 शिक्षक प्रशिक्षकांना प्रश्नावलीचे वितरण करण्यात आले. तसेच व्यक्तिमत्व विकास मार्ग संदर्भात केलेल्या पडताळ सूचीचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले त्यातील 18 शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले. टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करून शेवटी निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत. काही महत्त्वाच्या निष्कर्षांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :**

1. शिक्षक प्रशिक्षक म्हणून दहा वर्षांपेक्षा जास्त वर्ष सेवा करणाऱ्या प्रशिक्षकांचे प्रमाण शेकडा 75 इतके आहे.
2. सेट नेट उत्तीर्ण होऊन सेवेत रुजू झालेले शिक्षक प्रशिक्षकांपैकी विद्यावाचस्पती पदवी प्राप्त नसलेल्या प्रशिक्षकांचे शेकडा प्रमाण 45 इतके आहे .
3. 3.अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षक यांनी उद्बोधन व उजळा वर्ग पूर्ण केलेले आहे
4. बऱ्याच शिक्षक प्रशिक्षकांनी चर्चासत्रांमध्ये लेखनचे सादरीकरण केले आहे.
5. आवश्यक पात्रते व्यतिरिक्त उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे यामध्ये प्रशिक्षकांनी अन्य विषयातून पदवी व पदवीधर शिक्षण घेतलेले आहे.

6.उच्च शिक्षण घेण्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांची मानसिकता, आर्थिक अडचणी, कौटुंबिक अडचणी व संस्थेचे सहकार्य या बाबी अडथळ्याच्या ठरतात गुड मॉर्निंग

7. इंटेल या संस्थेकडून संगणकाचे प्रशिक्षण काही प्रशिक्षकांनी घेतलेले आहे.
8. ज्ञान वाढवण्यासाठी समाज संपर्क माध्यमांचा वापर जवळपास सर्वच प्रशिक्षक करतात. यामध्ये गुगल सर्च इंजिन व युट्युब इ. चा अधिक वापर प्रशिक्षकांकडून केला जातो.
9. नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षकांना स्वतंत्र मेंटर द्वारे मार्गदर्शन मिळाले नसल्यामुळे त्यांनी वरिष्ठानकडून अथवा सहकार्याकडून कार्याची माहिती मिळवली आहे.
10. महाविद्यालयामार्फत आर्थिक सहकार्य नसल्याने चर्चासत्र परिषद व कार्यशाळेत उपस्थित राहणे अडचणीचे ठरते.
11. अन्य संस्थेतील प्रशिक्षकांची संपर्क फार अत्यल्प असल्याने 800 अभ्यासक्रम व अन्य कार्याविषयी ची देवाणघेवाण कमी प्रमाणात होते होते.
12. नवीन अभ्यासक्रमातील इ पी सी या अंतर्गत शिकवावयाच्या विषयांचे स्वतंत्र प्रशिक्षण झालेले नाही असे बहुतांशी प्रशिक्षकांचे म्हणणे आहे.
13. शिक्षक प्रशिक्षक अवांतर व अभ्यासक्रमासंबंधीत ग्रंथांचे वाचन वेळेनुसार व आवश्यकतेनुसार करतात.
14. असे ज्ञान समृद्धीकरिता बहुतांश प्रशिक्षक गुगल सर्च इंजिन व youtube चा वापर करतात.
15.स्वयं पोर्टल वरील व तत्सम संस्था मार्फत असलेल्या ऑनलाईन कोर्सेस करणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकांचे प्रमाण कमी आहे.
16. महाविद्यालयामार्फत संगणक व इंटरनेट सुविधा ही नियमित व सुरळीत नसल्याने शिक्षक प्रशिक्षकांना अडचणी जाणवतात.
17. प्रशासकीय अडचणीमुळे आठवडा किंवा त्याहून अधिक दिवसांच्या कार्यशाळांना अथवा प्रशिक्षण सत्रांना उपस्थित राहणे अडचणीचे ठरते.
18. शिक्षक प्रशिक्षकांसाठी नाविन्यपूर्ण विषयातून कार्यशाळा व प्रशिक्षण उपलब्ध नसल्याचे बऱ्याच शिक्षक शिक्षकांचे म्हणणे आहे.

**शिफारशी :**

1.विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांना उजाळा वर्गाला उजळणी वर्गाला संबंधित प्राचार्यांनी पाठवावे याचा चांगला परिणाम विद्यार्थी शिक्षकांवर होतो.
2. संस्थाचालकांनी व प्राचार्यांनी प्रशिक्षकांना आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या विषयातून पदविका पदवी अथवा पदवी उत्तर शिक्षण घेण्यास प्रवृत्त करावे.
3. महाविद्यालयात सुरळीत व नियमित वायफाय सुविधा इंटरनेट सुविधा तसेच सुयोग्य संगणक प्रणाली उपलब्ध करून द्यावे ज्यामुळे प्रशिक्षकांना आशे ज्ञानवृद्धीस मदत होते.
4. महाविद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक प्रशिक्षकास प्राचार्यांनी मेंटॉर म्हणून नेमावे व त्यांच्या मार्फत नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षकांना महाविद्यालयाच्या कार्यक्रमाचा विषयी मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.
5. महाविद्यालयाने शिक्षण प्रशिक्षकांना आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा जेणेकरून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या संधीची द्वारे सतत उघडे राहतील.
6.अभ्यासक्रमांनी अभ्यासक्रमात बदल केल्यावर समावेशित केलेल्या नवीन संकल्पनांवर, विषयांवर विद्यापीठ स्तरावर कार्यशाळा, प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करावे.
7.मानव संसाधन विकास केंद्र विद्यापीठ व अन्य शिक्षण क्षेत्राशी संबंधित काम करणाऱ्या संस्थांनी अध्ययन अध्यापन करिता नवीन संगणकीय तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर,प्रभावी संप्रेषण कौशल्यांचा विकास ,नेतृत्व क्षमतांचा विकास यासारख्या नाविन्यपूर्ण विषयांवर सहजपणे पूर्ण करता येईल अशा अभ्यासक्रमांचे कार्यशाळेचे अथवा प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

**संदर्भ :**

1. भिलेगावकर , मोरे: **शिक्षक शिक्षण;**पुणे: नित्य नूतन प्रकाशन .
2. भिंताडे वि.रा.: **शैक्षणिक संशोधन** ;पुणे: नित्य नूतन प्रकाशन.
3. सप्रे नीलिमा, पाटील प्रीती(2001), **शिक्षणातील विचार प्रवाह** ;कोल्हापूर: फडके प्रकाशन.
4. https://www.prodigygame.com/main-en/blog/teacher-professional-development/

5. https://www.teachhub.com/professional-development
6. https://us.humankinetics.com/blogs/excerpt/barriers-to-professional-and-collaborative-success

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com